POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे


बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष-०५ ● अंक-२८१ ● मुंबई, गुरुवार, १४ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.


ग्राहकांना महागाईचा 'झटका'

-सोन्या-चांदीच्या आयात शुल्कात वाढ
-आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्के
- महागाईत आणखी भर पडण्याची शक्यता



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबई : पंतप्रदान नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना एक वर्ष सोन्याची खरेदी टाळण्याचे आवाहन केल्यानंतर आता सरकारने सोन्याच्या आयातीवर नियंत्रण आणण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. केंद्राने सोन्यासह इतर मौल्यवान धातूंवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवले आहे. नव्या दरांची अंमलबजावणी १३ मे २०२६ पासून लागू झाली आहे. या निर्णयामुळे सरकारला मोठा महसूल मिळू शकतो, मात्र दुसरीकडे सोन्याची आयात घटण्याची शक्यताही तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. आयात शुल्क वाढल्याचा थेट परिणाम स्थानिक बाजारपेठेतील दागिन्यांच्या किमतीवर होणार आहे. सराफा व्यापाऱ्यांना आता परदेशातून सोने मागवण्यासाठी जास्त कर भरावा लागणार असल्याने, ते हा बोजा ग्राहकांवर टाकतील. यामुळे केवळ दागिन्यांच्या किमतीच वाढणार नाहीत, तर इलेक्ट्रॉनिक आणि औद्योगिक उत्पादनांसाठी मौल्यवान धातूंचा वापर करणाऱ्या कंपन्यांचा खर्चही वाढेल. परिणामी, महागाईत आणखी भर पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



नेमके काय बदलले?

बजेट २०२४-२५ मध्ये सोन्याची तस्करी रोखण्यासाठी केंद्र सरकारने आयात शुल्कात मोठी कपात केली होती. त्यावेळी बेसिक कस्टम ड्युटी (BCD) ५ टक्के आणि ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर अँड डेव्हलपमेंट सेस (AIDC) १ टक्का ठेवण्यात आला होता. म्हणजेच एकूण आयात शुल्क ६ टक्के होते. मात्र आता सरकारने पुन्हा शुल्क वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

भारत किती सोने आयात करतो?

वित्त वर्ष २०२५-२६ मध्ये भारताने एकूण ७७५ अब्ज डॉलर्सच्या आयातीपैकी तब्बल ७१.९८ अब्ज डॉलरचे सोने आयात केले. म्हणजेच देशाच्या एकूण आयातीपैकी जवळपास ९ टक्के हिस्सा हा सोन्याचा होता. याच आधारावर पाहिले तर, ६ टक्के शुल्काच्या दराने सरकारला सुमारे ४.३२ अब्ज डॉलर महसूल मिळाला होता. आता शुल्क १५ टक्के झाल्यानंतर, आयात समान राहिली तर महसूल तब्बल १०.८ अब्ज डॉलरपर्यंत जाऊ शकतो.



- बेसिक कस्टम ड्युटी : ५% वरून १०%
- AIDC : १% वरून ५%
- एकूण आयात शुल्क : १५%



ग्राहक आणि बाजारावर होणारा परिणाम:

- - दागिने महागणार: आयातीवरील कर वाढल्याने रिटेल मार्केटमध्ये सोन्याचे दागिने लक्षणीय महाग होतील.
- - मागणीत घट: सोन्याच्या किमती वाढल्यामुळे लग्नसराईत दागिन्यांची मागणी ९-१० टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे.
- - हळुवार डिझाइन: ग्राहक आता जास्त वजनदार दागिन्यांऐवजी वजनाने हलक्या दागिन्यांची निवड करू शकतात.
- - जुने सोने बदलणे: नवीन सोने खरेदी करण्याऐवजी जुने दागिने बदलून घेण्याचा कल वाढू शकतो.

किमतींवर झालेला परिणाम

या निर्णयामुळे मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीच्या जुलै २०२६ च्या फ्युचर्समध्ये प्रति किलो १६,७४३ रुपयांची वाढ होऊन ती २,९५,८०५ रुपयांवर पोहोचली. सोन्याच्या जून २०२६ च्या फ्युचर्समध्ये प्रति १० ग्रॅम ९२०६ रुपयांची (6 टक्के) वाढ होऊन किंमत १,६२,६४८ रुपये झाली. दुसरीकडे, अमेरिकेतील ग्राहक महागाई एप्रिलमध्ये वेगाने वाढल्यामुळे, फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कपातीची अपेक्षा कमी झाली आहे, ज्याचा परिणाम जागतिक बाजारपेठेतील वातावरणावर झाला आहे.



भारताची सोन्याची भूक आणि अर्थव्यवस्था

चीननंतर भारत हा जगातील सोन्याचा दुसरा सर्वात मोठा ग्राहक देश आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताची सोन्याची आयात २४ टक्क्यांनी वाढून ७१.९८ अब्ज डॉलर्स या विक्रमी स्तरावर पोहोचली आहे. भारताच्या एकूण आयातीमध्ये सोन्याचा वाटा ९ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, ज्यामुळे देशाच्या चालू खात्यातील तुटीवर (CAD) ताण पडत आहे. प्रामुख्याने स्वित्झर्लंड, यूएई आणि दक्षिण आफ्रिकेतून होणारी ही प्रचंड आयात कमी करण्यासाठी आणि परकीय चलनाचा साठा वाचवण्यासाठी सरकारने हे कडक पाऊल उचलले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा 2026

बदलापूर क्रीडामय, राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे शानदार उद्घाटन

बदलापूरमध्ये इनडोअर स्टेडियम उभे करणार - आमदार किसन कथोरे



महाराष्ट्राची शान, खेळाचा महासंग्राम

बदलापूरमध्ये रंगलेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेच्या महाराष्ट्राची शान, खेळाचा महासंग्राम या स्पर्धा ब्रिदवाक्याचा प्रत्यय आज उद्घाटन समारंभात आला. स्पधेर्चे खेळ दमदार हे गीतही खेळाडूंच्या पसंतीला उतरले असून स्पधेर्चा लोगोही लक्षवेधी ठरत आहे.





■ठाणे। प्रतिनिधी,

ऑलिम्पिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा ही ऐतिहासिक ठरणार सांगून शहरात इनडोअर स्टेडियम उभे करणार असल्याचे घोषणा आमदार किसन कथोरे यांनी आज येथे केली. क्रीडामय वातावरणात शासनाच्या राज्य व्हॉलीबॉल स्पधेर्चे शानदार उद्घाटन करण्यात आले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पधेर्ला आजपासून दिमाखदार सुरूवात झाली. हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर रंगलेल्या स्पधेर्चे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा श्रीमती रूचिता घोरपडे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्यधिकारी मारूती गायकवाड, नगरसेवक किरण भोईर, माजी नगराध्यक्षा राजेंद्र घोरपडे, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे संजय नाईक, निलेश जगताप व राज्य व्हॉलीबॉल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते. बदलापूर व्हॉलीबॉल स्पर्धा ही ऐतिहासिक होईल असे सांगून श्रीमती रूचिता घोरपडे पुढे म्हणाल्या की, बदलापूर जिमखाना हे शहराचे वैभव आहे. शहरातील ५ क्रीडांगणे खेळाडूंसाठी उपलब्ध असून भविष्यात यातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय क्रीडापटू निर्माण होतील. बदलापूरमधील स्पर्धा ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा असल्याचे वातावरण दिसून येत आहे. क्रिकेटशिवाय इतर खेळतही करीअर होऊ शकते, असे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले. खेळाडूंच्या मिरवणूकीने बदलापूरमधील राज्य व्हॉलीबॉल स्पधेर्चा प्रारंभ झाला. यानंतर स्पधेर्चे शानदार उद्घाटन बदलापूर जिमखाना मैदानावरील भव्य मैदानात करण्यात आली. शाहीर नंदेश उमप यांच्या सांस्कृतिक मेजवानीसह जिम्नॉस्टिक्सची चित्तथरारक प्रात्यक्षिके उद्घाटन सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले. १३ ते १७ मे २०२६ कालावधीत होणाऱ्या या स्पधेर्साठी राज्यतील ८ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगणार आहे. स्पधेर्तील विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देणार येणार आहे. ८ विभागातील ३८४ खेळाडू, ३२ मार्गदर्शक, ३२ व्यवस्थापक, एकूण ४४८ जणांचे पथक सहभागी झाले आहे.स्पधेर्त कोल्हापूर, लातूर, अमरावती, संभाजीनगर, पुणे, नागपूर, मुंबई व नाशिक या संघात चुरशीच्या लढती सुरू झाल्या आहेत. १८ व २१ वर्षाखालील युवकांचा व्हॉलीबॉलचा थरार प्रथमच बदलापूरमध्ये पहाण्यास मिळणार आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मुंबई विभागाचे उपसंचालक नवनाथ फरताडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर आभार जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुवर्णा बारटक्के यांनी मानले.

मीरा-भाईंदर महापालिकेत बनावट दुरुस्ती बांधकाम परवानगी घोटाळा; बार, लॉजिंग आणि डान्सबारच्या बेकायदा बांधकामांत गैरप्रकार

■भाईंदर । प्रतिनिधी,

नेहमीच लाचखोरी आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे चर्चेत असलेल्या मीरा-भाईंदर महानगरपालिकामध्ये आता कथित बनावट दुरुस्ती बांधकाम परवानगी प्रकरण उघडकीस आले आहे. महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ अंतर्गत काशिमीरा येथील जनता डेअरी कंपाउंडमधील एका गाळ्याच्या नावावर देण्यात आलेल्या कथित बनावट दुरुस्ती परवानगीमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची मागणी प्रभाग अधिकाऱ्यांनी केली आहे. यापूर्वीही कांदळवन आणि मुंबई-अहमदाबाद महामार्ग लगत दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली तीन मजली इमारती उभारल्याचे प्रकार समोर आले होते. त्याप्रकरणी एका तत्कालीन पालिका अधिकाऱ्यावर २७ विभागीय चौकशा सुरू करण्यात आल्या आहेत. महापालिकेचे प्रभाग ६ चे सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी भरत सोनारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ मार्च २०२६ रोजी एका तक्रारदाराने बनावट दुरुस्ती परवानगीबाबत तक्रार दाखल केली होती. अंतर्गत तपासणीत संबंधित परवानगीची कोणतीही अधिकृत नोंद किंवा जावक क्रमांक कार्यालयाच्या नोंदवहीत आढळून आला नाही. हे प्रकरण गंभीर असल्याचे लक्षात आल्यानंतर, भरत सोनारे यांनी ५ मे रोजी तत्कालीन सहाय्यक आयुक्त प्रियंका भोसले यांना पत्र पाठवून माहिती दिली. संबंधित बनावट पत्रावर त्यांच्या कार्यकाळातील तारीख असल्याने त्यांनी स्पष्टीकरण देताना स्वाक्षरी बनावट असल्याचे स्पष्ट केले आणि आपण अशी कोणतीही परवानगी दिली नसल्याचे सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार, प्रियंका भोसले यांनी याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. संबंधित गाळाधारकाने या कथित बनावट परवानगीच्या आधारे अनधिकृत बांधकाम उभारून न्यायालयातून स्थगिती आदेश (स्टे ऑर्डर) देखील मिळवला आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून तपास अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. महापालिकेत दुरुस्ती परवानगीबाबत कोणतेही स्पष्ट धोरण किंवा कायदेशीर तरतूद नसतानाही, शहरात दुरुस्तीच्या नावाखाली शेकडो अनधिकृत बांधकामे उभी राहिल्याचा आरोप आहे. त्यामध्ये बार, लॉजिंग आणि डान्सबार यांसारख्या व्यावसायिक बांधकामांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असल्याचे सांगितले जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा 2026

खेळाडूंच्या मिरवणूकीने व्हॉलीबॉल स्पधेर्चा जल्लोषात प्रारंभ

बदलापूरमधील पाहुणचाराने भारावले राज्यभरातील क्रीडापटू



■ठाणे। प्रतिनिधी,

ढोल-ताशाचा गजरात मराठमोळे फेटे परिधान करीत उत्साहपूर्ण मिरवणूकीने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पधेर्चा बदलापूर शहरात आज शानदार प्रारंभ झाला. डिजीटल वॉटर बॉटलने स्वागत, विद्युतप्रकाश झोतातील सामने, थेट प्रेक्षपणासह बदलापूरमधील पाहुणचाराने राज्यभरातील खेळाडू भारावून गेल्याचे दिसून आले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पधेर्ला आजपासून दिमाखदार सुरूवात झाली. हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर रंगलेल्या स्पधेर्चा प्रारंभ खेळाडूंच्या मिरवणूकीने करण्यात आला. बदलापूरमधील शिवशंभू वाद्य पथकाच्या जल्लोषात फेटे परिधान केलेल्या खेळाडूंची मिरवणूक लक्षवेधी ठरली.

कुळगाव-बदलापूर नगरपरिषद माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, नगरसेवक किरण भोईर यांनी केले. यावेळी मुख्यधिकारी मारूती गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप व ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते.

बदलापूर जिमखानापासून सुरू झालेली मिरवणूक साई चौक, गणपती चौक मार्गे झेंडा चौकात आल्यानंतर क्रीडामय वातावरणात स्पर्धा स्थळी समाप्त झाली. दिड किमी अंतराच्या मिरवणूकीने हेंद्रेपाडा परिसर क्रीडामय झाल्याची अनुभुती उपस्थितींना आली.

दुपारच्या सत्रात स्पधेर्तील सहभागी अमरावती, मुंबई, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, कोल्हापूर विभागातील पार्श्वभूमीवर प्रशिक्षक व व्यवस्थापकांची बैठक पार पडली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मुंबई विभागाचे उपसंचालक नवनाथ फरताडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत , नगरसेवक किरण भोईर , महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुवर्णा बारटक्के आदी मान्यवर उपस्थित होते. राज्यातील उत्कृष्ट व्हॉलीबॉल प्रतिभेचा संगम या स्पर्धेत पाहायला मिळणार असे किरण भोईर यांनी यावेळी सांगितले. आमदार किसन कथोरे यांच्या विशेष प्रयत्नांतून ही मानाची राज्यस्तरीय स्पर्धा प्रथमच अंबरनाथ बदलापूर परिसरात आयोजित करण्यात येत असून, त्यामुळे प्रथमच स्थानिक खेळाडू, क्रीडाप्रेमी व युवकांना राज्यस्तरीय दर्जाच्या स्पधेर्ची पार्वणी पहाण्यास मिळाली आहे. १३ ते १७ मे २०२६ कालावधीत होणाऱ्या या स्पधेर्साठी राज्यतील ८ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगणार आहे.

डिजीटल वॉटर बॉटलने भारावले खेळाडू


बदलापूरमधील राज्य व्हॉलीबॉल स्पधार्तील सहभागी सर्व ३२ संघाच्या ३८४ खेळाडूंनी स्मरणीय भेटवस्तू देत स्वागत करण्यात आले. डिजीटल डिजीटल वॉटर बॉटलसह सॅक, कॅप आणि ओआरएसची पाकिटे खेळाडूंना देण्यात आली. तापमान दर्शविणाऱ्या डिजीटल वॉटर बॉटलने खेळाडू भारावून गेले होते. प्रथमच तापमान दर्शविणारी पाण्याची बाटली खेळाडूंच्या हाती आली होती. भर उन्हाळ्यात बदलापूरचे तापमान किती हे क्षणात खेळाडूंना समजून आले. तसेच उन्हापासून सरंक्षण होण्यासाठी ओआरएसची पाकिटे दिल्याने खेळाडू खुश असल्याचे दिसून येत होते.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आखाती युद्धाची इष्टापत्ती!



इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यामध्ये आखाती भागात जे युद्ध सुरू आहे, त्यामुळे जगावर विशेषतः जे देश तेलासाठी आखाती देशांवर अवलंबून आहेत, त्यांच्यावर मोठी आपत्ती कोसळली आहे. पण कुठल्याही आपत्तीची ही दुसरी जमेची बाजू असते, त्याला इष्टापत्ती म्हणतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनतेला या आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर हैदराबाद येथील एका कार्यक्रमात बोलताना मिनिमल जीवन पद्धती अंगीकारण्याचे आवाहन केले आहे, त्यावरून विरोधक त्यांच्यावर जोरदार टीका करत आहेत. काही नफेखोर व्यावसायिक लोक तसेच ज्यांना उधळपट्टी करून ऐशारामी जीवन जगणे अंगवळणी पडले आहे, ते नाराज झाले आहेत. पण मोदींनी भारतातील लोकांना अनावश्यक खर्च टाळा असा सल्ला दिलेला आहे, यात काहीच चुकीचे नाही. यात मोदींचा काही राजकीय आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे संतुलन राखण्याचा विषय असू शकेल, जसा त्यांनी परकीय चलनाचा उल्लेख केला. परकीय चलनाची गंगाजळी ही सुस्थितीत असणे हे कुठल्याही देशाच्या अर्थव्यवस्थेची सुदृढ स्थिती मानली जाते. आपला देश हा सुमारे ४५ देशांकडून तेल आयात करतो. सध्या आखाती देशांमधून येणारे तेल आणि गॅस यांच्या पुरवठ्यावर तिथल्या युद्धस्थितीमुळे मोठा परिणाम झालेला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे तेलवाहतुकीसाठी निर्णायक ठरर्णाया होर्मुझच्या सामुद्रधुनीत कोंडी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यातून होणारी तेलवाहतूक मंदावली आहे. परिणामी, भारतामध्ये पेट्रोल, डिझेल तसेच गॅसचे दर नियंत्रणात ठेवणे हे मोठे आव्हान ठरत आहे. एक वर्ष परदेशवारी टाळा असे आवाहन मोदींनी देशवासीयांना केले आहे, पण त्याचा पायंडा मोदींना स्वतःच घालून द्यावा लागेल. त्यांनी लोकांना वर्क फ्रॉम होमचे आवाहन केले आहे, त्याच धर्तीवर मोदींनाही देशविदेशातील ज्या विविध नेत्यांशी बैठका घ्यायचा असतात, त्या ऑनलाईन घ्याव्या लागतील. त्यांनी एक वर्षभर सोने खरेदी टाळा, असे आवाहन केलेले आहे, हे आजच्या तारखेला फार महत्त्वाचे आहे. कारण सोने हा भारतीय लोकांचा त्यातही भारतीय महिलांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असतो. त्यात पुन्हा जमीन आाणि सोने या दोन गोष्टी अशा आहेत की, ज्यांचा भाव कधीच कमी होत नाही तो वाढतच जातो. त्यामुळे लोक काटकसर करून या गोष्टींच्या खरेदीला प्राधान्य देतात. आता सामान्य माणसाला जमीन खरेदी करणे शक्य नसते, पण तो काहीही करून थोडेबहुत का होईना, सोने खरेदी करण्याचा प्रयत्न करतो. पण हे सोने खरेदी करताना त्याची प्रचंड आर्थिक पिळवणूक होत असते. विशेषतः लग्नात मंगळसूत्र, हार आणि अंगठी ही खंया सोन्याची असावी, यावर लोकांचा भर असतो. एक तोळा सोन्याची किंमत सध्या १ लाख ८३ हजार इतकी आहे. या सोन्यापासून दागिना बनवण्याचा, घडणावळीचा खर्च वेगळा असतो. लग्नासाठी इतर गोष्टींवर होणारा मोठा खर्च असतोच, अशा स्थितीत सामान्य माणसाने लग्न कसे करायचे, असा प्रश्न पडतो. त्यामुळे अनेक लोक कर्जबाजारी होत आहेत, त्याला मुख्य कारण सोन्या-चांदीचे वाढते भाव आहेत. त्यामुळे कुणी तरी महत्त्वाच्या व्यक्तीने सोने खरेदीवर आघात करण्याची गरज होती, तो नरेंद्र मोदींनी केली. ते त्यांनी अतिशय मौलिक काम केलेले आहे. मोदींच्या या वक्तव्यामुळे सामान्य माणसाला दिलासा मिळाला आहे. कारण सोने हा भारतीय माणसाचा भावनिक आणि लग्नकार्यात प्रतिष्ठेचा विषय असल्यामुळे त्याची प्रचंड आर्थिक पिळवणूक होते. ज्यावेळी एखाद्या वस्तूची मागणी मोठी असते आणि काहीही करून लोक ती खरेदी करणार हे व्यावसासिकांना माहीत असते, तेव्हा ते त्या वस्तूची किंमत हवी तशी वाढवत नेऊन प्रचंड नफा कमावतात. पण दुर्सया बाजूला सामान्य माणसाची लूट होते त्याचा ते विचार करत नाहीत. आता स्वतः पंतप्रधानांनीच सोने खरेदी करू नका, असे आवाहन केल्यामुळे सोन्याचे मार्केट पडणार आहे. खरेदी घटली की भाव आपोआप उतरतात. त्यामुळे पंतप्रधानांचे हे आवाहन सामान्य माणसांच्या हिताचे असून नफेखोरांवर आघात करणारे आहे. पंतप्रधान मोदींनी भारतीयांना गरजेनुसार इंधन वापरण्याचे आणि ऊर्जा बचतीचे महत्त्वाचे आवाहन केले आहे. हेदेखील अतिशय महत्त्वाचे आहे. कारण आता केवळ शहरातच नव्हे तर गावोगावी लोकांनी दुचाकी, चार चाकी खरेदी केलेल्या आहेत. काहींच्या घरी तर प्रत्येकाची वेगळी चारचाकी गाडी आहे. प्रत्येकजण स्वतःचे वेगळे वाहन वापरत असल्यामुळे इंधनाचा वापर तितक्याच पटींनी वाढत आहे. मागणी वाढल्यामुळे इंधनाचे भावही वाढत जातात. लोक मोठ्या प्रमाणात खासगी वाहने खरेदी करतात, त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. मोठ्या प्रमाणात वायू आणि ध्वनी प्रदूषण होते. पृथ्वीवर जी संसाधने आहेत, त्याची वारेमाप उधळपट्टी केली जात आहे. त्या संसाधनांचा आपण जर माफक उपयोग केला तर तो आपल्या आरोग्यासाठी, निसर्गाच्या संवर्धनासाठी उपयुक्त ठरेल. अलीकडच्या काळात अनेक समजुतदार लोक मिनिमल जीवन पद्धतीचा अवलंब करू लागले आहेत. याचा अर्थ अनावश्यक वस्तू, गरजा आणि पसारा कमी करून साधे, अर्थपूर्ण आणि शांतपूर्ण जीवन जगणे. ही जीवनशैली कमी साधनांचा वापर करून दजेर्दार जीवन जगण्याच्या तत्त्वावर काम करते. ज्यामुळे मानसिक शांतता, आर्थिक बचत आणि उत्पादकता वाढते. हे केवळ वस्तूंपुरते मर्यादित नसून विचारांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. आखाती युद्धात जेव्हा अमेरिका उतरली तेव्हा मोदींनी कोरोनासदृश्य परिस्थितीला सामोरे जायला तयार रहा, असे सूचवले होते. त्यावेळी मोदी कोरोना काळातील नियम लागू करणार की काय, असा संशय व्यक्त होऊ लागला होता, पण तो मोदींनी व्यक्त केलेला पुढील परिस्थितीचा अंदाज होता. आखाती युद्ध हे या सगळ्यांसाठी निमित्त असले तरी ही आपत्ती इष्टापत्ती मानून लोकांनी आपल्या सवयी सुधारल्या तर ते लोकांच्या आणि निसर्गाच्या हिताचेच ठरेल.

एका अधुऱ्या कायद्यामुळे नराधमांना 'शक्ती'

महाराष्ट्रात दर ५३ मिनिटांनी एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव आहे. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे, तर अधु□या शक्ती कायद्यामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही. पुण्याच्या नसरापूरमध्ये साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार होऊन तिची हत्या झाली. तिच्यानंतर पर्वतीत नऊ वर्षांच्या मुलीवर आजोबाने हात टाकला. चाकणमध्येही पुन्हा तशीच घटना. हे महाराष्ट्र दिनाच्याच आठवड्यातले चित्र आहे. पण या चित्राच्या पार्श्वभूमीत एक काळोखा कोपरा आहे, जिथे राजकारण चालू आहे. थंड, निगरगट्ट, स्वार्थी राजकारण.



शक्ती कायदा राजकारणात अडकला. २०२१ मध्ये महाराष्ट्र विधानसभेने शक्ती कायदा एकमताने मंजूर केला. बलात्कार, बालकांवरील अत्याचार, □सिड हल्ले यांसाठी २१ दिवसांत चौकशी, खटला आणि शिक्षा हा कायद्याचा गाभा होता. आंध्र प्रदेशातील ह्यदिशाह्न कायद्याच्या धर्तीवर बनवलेला हा कायदा देशातील सर्वाधिक कठोर ठरला असता. मग हा कायदा कुठे आहे आज? केंद्र सरकारच्या धूळखात पडलेल्या फाइलींमध्ये. तीन वर्षांहून अधिक काळ. फौजदारी कायदा हा समवर्ती सूचीत येतो. त्यामुळे राज्याने पारित केलेल्या अशा कायद्यांना केंद्राची अंतिम मंजुरी लागते हे घटनात्मक सत्य आहे. पण घटनेने ही प्रक्रिया अडवण्यासाठी दिलेली नाही, ती समन्वयासाठी दिली आहे. केंद्राने शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? एकही तांत्रिक उत्तर आजपर्यंत दिले गेले नाही. कारण अडथळा तांत्रिक नव्हता. जो अडथळा होता तो राजकीय होता. महाविकास आघाडी सरकारने बनवलेला कायदा केंद्रातील भाजपने मंजूर करायचा हे त्यांना रुचले नाही. एखाद्या विरोधी सरकारच्या यशाला मुद्रांकन द्यायचे नाही, हा पक्षाचा अलिखित नियम. या नियमाची किंमत नसरापूरच्या त्या चिमुरडीने जीव देऊन चुकवली. हे आकलन कठोर वाटते का? तर विचार करा, आंध्र प्रदेशातील ह्यदिशाह्न कायदा केंद्राने किती वेळात मंजूर केला होता? त्या राज्यात भाजपशी मैत्रीपूर्ण सरकार होते. महाराष्ट्रात शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी असलेले सरकार होते. हा योगायोग नाही. हे राजकीय गणित आहे. हे गणित सुटले तेव्हा काय झाले? महाराष्ट्रात सत्तांतर झाले, महाविकास आघाडी गेली, महायुतीचे सरकार आले आणि भाजपचा मुख्यमंत्री आला. आता शक्ती कायद्याला मंजुरी द्यायला काय अडथळा होता? उत्तर शून्य असायला हवे होते. पण तरीही कायदा लटकतच राहिला. तेव्हा बदलापूरमध्ये शाळेत दोन चिमुरड्यांवर अत्याचार झाला, राज्य पेटले, पुन्हा आश्वासने दिली. मग २०२५ मध्ये एक नवे ह्यसुधारित शक्ती विधेयकह्न आले. भारतीय न्याय संहितेत फेरफार करत. हे विधेयक म्हणजे काय होते? मूळ शक्ती कायद्याची सावली. त्यातील दोन तरतुदी डिजिटल छळाविरोधात आणि □सिड हल्ला पीडितेच्या गोपनीयतेसाठी इतक्याच घेतल्या. बाकी कठोर तरतुदी, २१ दिवसांची वेळमयार्दा, जलदगती यंत्रणा हे सगळे भारतीय न्याय संहितेमध्ये आधीच आहे असे सांगून सोडण्यात आले. पण जर भारतीय न्याय संहितेत पुरेशा तरतुदी आहेत, तर नसरापूरमध्ये न्याय का मिळत नाही? जर फास्ट ट्रॅक कोर्ट आहे, तर पुणे जिल्ह्यात नोव्हेंबर २०२५ पर्यंत सहा हजारांहून अधिक पोक्सो प्रकरणे प्रलंबित का होती? उत्तर साधे आहे. कायदा असणे आणि कायदा चालवणे यात फरक आहे. हा फरक दूर करण्याची इच्छाशक्ती या सरकारकडे नाही.

प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे?

नसरापूरचा आरोपी भीमराव कांबळे हा यापूर्वी दोनदा तत्सम गुन्ह्यांत अटक झालेला होता. दोन्ही वेळा पुराव्याअभावी सुटला. या माणसाला तिसऱ्यांदा संधी मिळाली ती कशामुळे? तपासाच्या सुमार दजार्मुळे, न्यायालयीन विलंबामुळे आणि पीडितांना वेळेत न्याय न मिळाल्यामुळे. हे तिन्ही प्रश्न शक्ती कायद्याच्या तरतुदींनी सोडवले असते. आता सत्ताधारी म्हणतील की, भारतीय न्यायसंहितेमध्ये तरतुदी आहेत, पोक्सो आहे, एसआयटी स्थापन केली आहे. पण हे सगळे घटना घडल्यानंतर. प्रतिबंधक व्यवस्था कुठे आहे? पूर्वसावधगिरी कुठे आहे? सत्य हे आहे की, या सरकारला घटनेनंतर उद्रेक आवरण्यात रस आहे, प्रश्न सोडवण्यात नाही. एसआयटी हे संताप झाकणारे झाकण आहे, उपाय नाही. जमाव रस्त्यावर उतरतो, पोलीस स्टेशनसमोर जमतो, आरोपीला आमच्या स्वाधीन करा असे ओरडतो. हे दृश्य लोकशाहीसाठी धोकादायक आहे.

या धोक्याचे मूळ कारण जनतेत नाही. जेव्हा व्यवस्था न्याय देत नाही, तेव्हा माणूस न्याय विकत घेण्याचा किंवा स्वतः करण्याचा प्रयत्न करतो. हा समाजशास्त्राचा नियम आहे. त्यामुळे अत्याचाराच्या घटनांना जबाबदार धरायचे असेल तर ते शक्ती कायदा अडवणाऱ्यांना धरावे लागेल.

आजपर्यंत महाराष्ट्रात एक जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२६ या सोळा महिन्यांत ९३ हजार ३९० पोक्सो गुन्हे दाखल झाले. दर ५३ मिनिटांनी एक अत्याचार होतो. ही आकडेवारी पाहून केवळ गुन्हेगारांना दोष देता येणार नाही. ही आकडेवारी जी व्यवस्था कायदे बनवते, ते अडवते, त्यांची अंमलबजावणी करत नाही आणि प्रत्येक घटनेनंतर केवळ निषेधाचे नाटक करते त्यांनाही दोषी धरते. नसरापूरची चिमुरडी गेली. तिला परत आणणे कोणाला शक्य नाही. पण पुढची नसरापूर टाळणे शक्य आहे. जर इच्छाशक्ती असेल तर ते शक्य आहे. अन्यथा बालकांच्या जीवाचे रक्षण करण्याऐवजी सरकार राजकीय श्रेयाच्या लढाईत मग्न राहिले, तर त्याची इतिहासात नोंद होईल.

इच्छाशक्तीचा प्रश्न

एसआयटी स्थापन होते, निषेध होतो, आश्वासने दिली जातात, पण दर ५३ मिनिटांनी महाराष्ट्रात एक मूल अत्याचाराला बळी पडते हे वास्तव बदलत नाही. शक्ती कायद्याचे उदाहरण सांगते की, महाराष्ट्रात राजकीय इच्छाशक्ती असेल तर कायदे बनतात, पण ते प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच त्यांना राजकारणाची चाळणी लागते. नसरापूरच्या चिमुरडीचा प्राण गेला, तो केवळ एका नराधमाच्या पाशवीपणामुळे नव्हे तर एका अधुऱ्या कायद्यामुळे, एका प्रलंबित न्यायामुळे आणि एका बधिर व्यवस्थेमुळेही.

अच्छे दिन हेच का?




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन केले. आखातातील युद्धामुळे इंधन टंचाई निर्माण झाली. इंधनावरील वाढत्या खचार्मुळे अर्थव्यवस्थेवर दबाव पडत आहे. यामुळे देशवासीयांनी इंधनाचा वापर काटकसरीने करण्याचा सल्ला पंतप्रधानांनी दिला. पेट्रोल, डिझेल, गॅसचा जपून वापर करा. वर्षभर सोने खरेदी करू नका. परदेश प्रवास टाळण्याचेही मोदींनी सांगितले. मात्र हे आवाहन करण्याला पंतप्रधानांनी उशीर केला, असा हल्लाबोल विरोधकांकडून होत आहे. हैदराबादमधील सभेत पंतप्रधानांनी देशवासीयांना काटकसरीचं आवाहन केलं. त्यानंतर सोमवारी वडोदरा येथेही पेट्रोल, डिझेल, गॅसच्या काटकसरीचा सल्ला दिला. सलग दोन दिवसांपासून मोदींकडून काटकसरीचा सल्ला दिला जातोय. मात्र इंधनाची कमतरता काही काल-परवा आलेली नाही. युद्ध काही आठ दिवसांपूर्वी सुरू झालेलं नाही. फेब्रुवारीच्या शेवटी इराण-अमेरिका, इस्त्रायल युद्धाला सुरुवात झाली. तेव्हा पंतप्रधानांसह सरकारच्या सर्वच मंत्र्यांकडून देशात इंधनाची टंचाई नसल्याची आवई ठोकण्यात आली. सर्वकाही आलबेल असल्याचं सांगण्यात आलं. तेव्हाच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशावर मोठं संकट येणार असल्याचा इशारा दिला होता. लाखो, कोटी लोकांचे रोजगार जातील अशी परिस्थिती येऊ शकते, त्यासाठी आपल्याला आतापासून तयारी करण्याची सूचना त्यांनी पंतप्रधान मोदींना केली होती. मात्र त्याची दखल सरकारने घेतली नाही.

विरोधी पक्षनेता या नात्याने त्यांनी एकदा नाही तर वारंवार या संकटाची जाणीव करून दिली. अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबद्दल चचेर्ची मागणी केली. विरोधकांच्या या चर्चेच्या मागणीवर जगर्दबिका पाल यांनी सभागृहाचा किती पैसा वाया चालला याचा हिशेब मांडला होता. तेव्हाच यावर सविस्तर चर्चा घडवून आणली असती तर आज देशाचा हिशेब चुकण्याची वेळ आली नसती, कुठे तरी ही गोळाबेरीज जुळवून आणता आली असती. मात्र सत्ताधार्यांकडून विरोधकांना सपशेल डावलण्यात आले. गेल्या 12 वर्षात विरोधी पक्षाचे सल्ले सातत्याने धुडकावून लावण्यात आले. 9 आणि 12 मार्चला राहुल गांधी यांनी देशावर ओढवर्णाया संकटाची जाणीव करून दिली होती.राहुल गांधी यांनी दिलेल्या इर्शायाकडे सरकारने सपशेल दुर्लक्ष केले. राहुल गांधी यांचं सरकारने ऐकलं असतं आणि दोन महिन्यांपासूनच उपाययोजना सुरू केल्या असत्या तर आता ओढवलेल्या संकटातून काहीसा दिलासा नक्कीच मिळाला असता, असा दावा विरोधक करत आहेत. मात्र महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेत्याला रिजेक्टेड माल ठरवून टाकले. विरोधकांना निकालात काढण्याचे काम सत्ताधारी करत आले आहेत. विरोधकांच्या टीकेला गांभीयार्ने घ्यायचे नाही. त्यांनी सांगितलेल्या उपाययोजना उडवून लावायच्या. जेव्हा देश संकटात सापडेल तेव्हा जनतेवरच त्याचे दायित्व देऊन सरकारने हात वर करायचे, मग मोदी है तो मुमकिन है, म्हणणंही भाजप नेत्यांनी सोडून दिलं पाहिजे.

पंतप्रधान हे देशाचे प्रमुख आहेत. त्यांनी देशवासीयांना सल्ला दिलाच पाहिजे. पण तो एखाद्या सार्वजनिक सभेतून द्यायचा असतो का? पहिली सभा हैदराबादला, दुर्सया दिवशी वडोदरा. या सभांपूर्वी पंतप्रधान भलामोठा रोड शो करतात, त्यामध्ये शेकडो गाड्या त्यांच्या मागे पुढे धावतात. हे सगळं करून तुम्ही देशाला उपदेश करत आहात, हे देशवासीयांना रुचलेलं नाही हेही आता समोर येऊ लागलं आहे. आपल्याकडे तेलाच्या विहिरी नाहीत, सोन्याच्या खाणी नाहीत, त्यामुळे हे परदेशातून आयात करावे लागते. त्यासाठी डॉलरमध्ये खर्च करावा लागतो. 12 वर्षात रुपया घसरत घसरत एवढा खाली गेलाय की आता त्याला डॉलर शंभरनंबरी चष्म्यातून पाहावा लागतोय. देशात परकीय चलनाची कमतरता झाली आहे, हे सामान्यांनाही कळून चुकले आहे. त्यासाठी पंतप्रधानांनी अर्थमंत्र्यांशी, आरबीआयच्या गव्हर्नरांशी आधी बोलले पाहिजे होतं.सर्वपक्षीय बैठक बोलावून, सर्व नेत्यांना विश्वासात घेऊन, देशाची आजची आर्थिक स्थिती, त्याचे आकडे त्यांनी सांगितले असते, तर त्यांनीही काही उपाय सुचवले असते. यानंतर पत्रकार परिषद घेऊन हे सर्व आकडे आणि स्थिती देशासमोर ठेवली असती आणि देशवासीयांना काटकसरीत जगायला सांगितले असते, तर समजू शकले असते. पहलगाम हल्ल्यानंतर विरोधी पक्षातील सर्वच नेत्यांनी आणि संपूर्ण देशाने एकत्र येऊन पहलगामवरील हल्ला हा देशावरचा हल्ला म्हटलंच होतं. त्या हल्ल्याविरोधात सर्वपक्ष एकत्रित आले, हे याच देशात घडलेलं आहे. तेव्हा मोदींनी देशावर आर्थिक संकट आलेलं असताना, ना अर्थमंत्र्यांसोबत चर्चा केल्याची माहिती आहे, ना रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरकडून त्यांनी माहिती घेतल्याचे कळते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, 2014 मध्ये केंद्रात सत्तेत आलेल्या मोदी सरकारने गेल्या 12 वर्षांत काय कमावले आणि काय गमावले याचाही हिशेब देशासमोर मांडला पाहिजे. जेव्हा नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हा डॉलरच्या तुलनेत रुपया 60-65 रुपयांवर होता. तेव्हा रुपयाच्या घसरणीवरून देशाची अब्रू कोसळत होती. मग आता रुपया शंभरीवर पोहोचला तेव्हा काय कोसळत आहे? ब्रेनड्रेन होत असल्याचा आरोप तेव्हा विरोधकांकडून होत होता. रुपया कोसळण्याला फक्त इंधन आणि सोनंच कारणीभूत नाही, हेही लक्षात घेतलं पाहिजे. मोदी सरकारच्या गेल्या 12 वर्षांमध्ये 12 लाखांहून अधिक उद्योजक आणि अतिश्रीमंतांनी देश सोडला आहे. जर देशातील उद्योजक देश सोडून जात असतील तर ते त्यांच्यासोबत त्यांची गंगाजळीही येथून घेऊन जात आहेत. उद्योगस्नेही वातावरण त्यांना मिळत नसेल, सुरक्षेची हमी दिसत नसेल तर पलायन होणार. ही असुरक्षितता आता जेम्स आणि ज्वेल्स व्यापारी, कारागिर आणि सामान्यांपर्यंत आली. पंतप्रधान मोदींनी दाखवलेले अच्छे दिन हेच का, असं आता जनता विचारत आहे.

पडद्याकडून (परत) पुस्तकाकडे!



डिजिटल तंत्रज्ञान युगाची चाहूल लागताच त्याच्याद्वारे शिक्षण देण्यात अग्रेसर राहिलेला देश म्हणजे स्वीडन. नवीन सहस्त्रक सुरू झाल्यानंतर, शाळांत लॅपटॉप, टॅब्लेट्स, स्मार्टफोन आदी साधनांचा वापर करणारा हा देश याबाबत आता परतीचा प्रवास सुरू करताना, छापील पुस्तके, वह्या, पेन या भौतिक साधनांवर भर देऊ लागलाय. त्यावर तिथे उलट-सुलट प्रतिक्रिया उमटत आहेत; परंतु लहान वयात डिजिटल साधने वापरण्याचा विपरीत परिणाम होत असल्याचा निष्कर्ष काढणा□या काही संशोधनांचा दाखला देत आणि वाचन, लेखन आदी कौशल्यांत, तसेच आकलनाबाबत स्वीडिश विद्यार्थ्यांची पीछेहाट होत असल्याचे सांगत सरकार आपल्या भूमिकेचे समर्थन करीत आहे. शालेय शिक्षणासाठी 'डिजिटल'चा अवलंब करण्यात स्वीडन हा आघाडीवर राहिलेला देश; २०१५मध्ये तेथील सरकारी शाळांतील ८० टक्के विद्यार्थी या तंत्रज्ञानाचा वापर करीत होते. २०१९मध्ये तिथे टॅब्लेट्सचा वापर बंधनकारक केले गेले आणि त्यानुसार अभ्यासक्रमात बदलही केला गेला. डिजिटल युगासाठी आपल्या विद्यार्थ्यांना तयार करण्याची भूमिका तेथील समाजवादी सरकारने घेतली. पुढे २०२२मध्ये सत्तांतर होऊन उजव्या आघाडीचे सरकार सत्तेवर आले आणि शिक्षणातील डिजिटल तंत्रज्ञानाच्या अतिवापराबाबत चर्चा सुरू झाली. प्रगत देशांत शिक्षणाचे मापदंड असलेल्या 'पिसा' क्रमवारीत स्वीडनची घसरण झाल्याचे निमित्त त्याला होते. या पार्श्वभूमीवर, पूर्वप्राथमिक स्तरावरील मुलांच्या वाचन, लेखन आणि आकलन क्षमतेवर परिणाम होत असल्याचे नमूद करून, 'फ्रॉम कॅम टिल पॅम' (पडद्यापासून (पुस्तकाच्या) कव्हरपर्यंत) अशी घोषणा तेथील नवीन सरकारने दिली. डिजिटल पडद्यापासून मुलांना शक्य तितक्या दूर नेण्याचा प्रयत्न असल्याची भूमिकाही मांडली. पूर्वप्राथमिक वर्गांत डिजिटल साहित्याची गरज नाही, असा निर्णय झाला; आणि या वर्षापासून शाळांत मोबाइल फोन वापरण्यावर बंदी घातली गेली. पाठ्यपुस्तके, वह्या, पेन आदींचाच वापर वर्गांत केला जावा, अशी ठाम भूमिका घेऊन त्यांसाठी निधीची तरतूदही केली गेली. पाठ्यपुस्तकांचा वापर वाढविणारा नवा अभ्यासक्रमही तिथे विकसित केला जात आहे. डिजिटल साधने शिक्षणासाठी पूरक की अपायकारक, हा प्रश्न या निमित्ताने पुन्हा चर्चेत आला आहे. डिजिटल तंत्रज्ञान हे आजचे वास्तव असून, सर्व क्षेत्रांत त्याचा वापर आहे; त्यामुळे ते शिकणे, त्याचा वापर अपरिहार्यच. शिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाची व्याप्ती विलक्षण वेगाने वाढत असल्याने त्यापासून दूर राहणे व्यवहार्य नाही. शिक्षणासाठी इतकी वर्षे ही साधने वापरली जात असल्याने, त्यासाठी विकसित झालेल्या औद्योगिक संस्थांमधून प्रतिकूल प्रतिक्रिया उमटणेही स्वाभाविक. मात्र, पूर्वप्राथमिक स्तरावरच मुलांना डिजिटल साधने दिल्यावर त वाचनक्षमता विकसित होण्यावर परिणाम होत असल्याची निरीक्षणे आहेत. लॅपटॉप, टॅब्लेट किंवा मोबाइल फोन यांच्या पडद्यावर बोट फिरवत वाचताना एकाच वेळी अन्य कामे (म्हणजे नवीन टॅब वा विंडो उघडून पाहणे, वाचतानाच व्हिडिओ उघडून पाहणे आदी) करण्याची सवय लागते, याकडे अभ्यासक लक्ष वेधतात. छापील पुस्तक वाचण्यासाठी एकाग्रता लागते आणि त्यामुळे ते वाचलेले लक्षात राहते, असेही काहींचे म्हणणे. डिजिटल पडद्यावरचे वाचणे आणि छापील पुस्तक वाचणे यांत फरक आहे का? मुळात वाचन हे बोलण्याहून अवघड असे कौशल्य आहे; वाचताना आपले डोळे विशिष्ट ओळींवरून फिरत असतात आणि आकलन करून घेत असतात; त्या वेळी अन्य अडथळे आल्यास फरक पडतो, हे शास्त्रज्ञ मान्य करतात. मात्र, 'किंडल'सारखी ई-रीडर साधने छापील पुस्तकांप्रमाणेच असल्याने या दोहोंमुळे फरक पडत नाही, हेही ते नमूद करतात. एकंदरीत डिजिटल पडदा अटळ असला, तरी तो लहान वयात नको, यावर एकमत होताना दिसतेय; म्हणूनच स्वीडन 'पडद्याकडून पुस्तकाकडे'परत चालला आहे.

भारतातल्या या मंदिरात आहे दिवसातून तीनवेळा रंग बदलणारे शिवलिंग!



भारतात अनेक प्राचीन मंदिरे आहेत. ज्यांच्याशी संबंधित रहस्ये अनेक शतकांपासून लोकांना आकर्षित करत आहेत. श्रावणाचा तिसरा सोमवार आहे त्यानिमित्तानेच आज आपण अशा एका मंदिराबाबत जाणून घेणार आहोत जिथे रोज एक चमत्कार घडतो.

एक अनोखे मंदिर राजस्थानच्या धौलपूरमध्ये आहे. चंबळ नदीच्या खोऱ्यात वसलेले हे शिवमंदिर 'अचलेश्वर महादेव' मंदिराच्या नावाने ओळखले जाते. असे म्हणतात की या मंदिरात असलेले शिवलिंग दिवसातून तीन वेळा आपला रंग बदलते. हे मंदिर डोंगराळ भागात वसलेले असल्यामुळे पूर्वी येथे मोजकेच लोक येत असत, पण हळूहळू मंदिराची माहिती मिळताच येथे भाविक येऊ लागले आणि श्रावण महिन्यात येथे विशेष पूजाही सुरू होते.

जगभरात शिवभक्त असून ते महाशिवरात्रीच्या दिवशीही येथे गदीर्चा महापूर उसळतो. भक्त इथे भोलेनाथांचे दर्शन घेऊन त्यांच्यावर अभिषेकही करतात. इथे अभिषेक केल्याने इच्छा पूर्ण होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. येथे भगवान शंकराच्या अंगठ्याची पूजा केली जाते असे इतिहासकार सांगतात. गर्भगृहातील शिवलिंग हे पाताळातल्यासारखे दिसते. ज्याच्या वर एका बाजूला पायाच्या बोटाची खूण कोरलेली आहे, ज्याची स्वयंभू शिवलिंग म्हणून पूजा केली जाते. देवाधिदेव महादेवाच्या उजव्या पायाच्या अंगठ्याचे प्रतिक मानले जाते. अचलेश्वर मंदिर पंधराव्या शतकात बांधले आहे. मेवाडचा राजा राणा कुंभ याने अचलगड किल्ला एका टेकडीवर बांधला. या किल्ल्याजवळच अचलेश्वर मंदिर आहे, तिथे परमेश्वराच्या शिवलिंगाखाली नैसर्गिक खड्डा आहे. या खड्ड्यात कितीही पाणी टाकले तरी तो भरत नाही. त्यात दिलेले पाणी कोठे जाते हे अद्याप एक गूढ आहे. हे शिवलिंग दिवसातून ३ वेळा रंग बदलते. सकाळी शिवलिंग निळसर रंगाचे, दुपारी भगवे आणि रात्री शिवलिंग काळ्या रंगाचे दिसते. असे का घडते हे आजपर्यंतचे रहस्य आहे.

भोले भंडारी भक्तांच्या इच्छा करतात पूर्ण

असे म्हणतात की या गूढ शिवलिंगाच्या दर्शनाने माणसाच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात आणि जीवनातील सर्व प्रकारचे संकट दूर होतात. जीवनात कोणतीही समस्या असली तरी या मंदिरात गेल्यावर त्यातून आराम मिळतो. या महादेवाच्या मंदिराविषयी अशी श्रद्धा आहे की अविवाहित मुला-मुलींना शिवलिंगाचे दर्शन घेतल्याने त्यांना इच्छित जीवनसाथी मिळतो.

भगवान शंकराला जल अर्पण करण्यासाठी सोमवारी येथे मोठी गर्दी जमते. अविवाहितांनी १६ सोमवारी येथे जल अर्पण केल्यास त्यांना इच्छित जीवनसाथी मिळतो. याशिवाय शिवाच्या कृपेने विवाहातील अडथळेही दूर होतात.

महादेवांचा महिमा अगाध, भारतातलं असं मंदिर जे दिवसातून दोनवेळा होते अदृष्य

आपल्या आसपास दैवी शक्ती उपस्थित आहे याची प्रचिती आपल्याला वेळोवेळी येते. भारताला मंदिरांचा देश म्हटलं जातं. इथे प्रत्येक ठिकाणी तुम्हाला मंदिरे दिसतीस. त्या प्रत्येक मंदिराची एक कथा आहे. सध्या श्रावण महिना सुरू आहे. त्यामुळे महादेवांच्या मंदिराबद्दल माहिती घेऊयात.

भारतात भगवान शंकरांची अनेक मंदिरे आहेत. पण, असेही एक मंदिर आहे जे दिवसातून दोनवेळा अदृश्य होते. गुजरातमधील वडोदरा येथे भगवान शंकराचे एक मंदिर आहे. जे अदृश्य होते आणि नंतर अचानक पुन्हा दिसू लागते. या मंदिराच्या या चमत्कारामुळे ते जगभर प्रसिद्ध असून शंकरांचे भाविक हा चमत्कार डोळ्यांनी पाहण्यासाठी गर्दी करतात. चला जाणून घेऊया या मंदिराविषयी सविस्तर स्तंभेश्वर महादेव मंदिर समुद्रात आहे. हे मंदिर भगवान शंकराचा पुत्र कार्तिकेय याने आपल्या तपोबलातून बांधले होते. हे मंदिर गायब होणे हा चमत्कार नसून एका नैसर्गिक घटनेचा परिणाम आहे. किंबहुना दिवसातून किमान दोनदा समुद्राची पाण्याची पातळी इतकी वाढते की मंदिर पूर्णपणे समुद्रात बुडालेले असते. मग काही क्षणात समुद्राची पाण्याची पातळी कमी होते आणि मंदिर पुन्हा दिसू लागते. हे रोज सकाळ-संध्याकाळ घडते. भाविक या घटनेला समुद्रकिनारी भगवान शंकरांचाच चमत्कार म्हणतात. भाविकांना हे दृश्य दूरवरून पाहता येते.



मंदिराच्या बांधकामाशी संबंधित कथा

स्कंद पुराणात या मंदिराच्या बांधकामाशी संबंधित कथा आढळते. आख्यायिकेनुसार तारकासुर राक्षसाला कठोर तपश्चर्येच्या जोरावर शिवाकडून आशीर्वाद मिळाला की, त्याचा मृत्यू तेव्हाच शक्य आहे जेव्हा शिवपुत्र त्याचा वध करतो. भगवान शंकराने त्याला वरदान दिले. आशीर्वाद मिळताच तारकासुराने संपूर्ण विश्वात हाहाकार माजवण्यास सुरुवात केली.

तर दुसरीकडे शिवाच्या तेजातून जन्मलेल्या कार्तिकेयाचे संगोपन कृत्तिका करत होती. आपल्या क्रोधातून लोकांची सुटका करण्यासाठी बलरूप कार्तिकेयाने तारकासुराचा वध केला. पण तारकासुर हा शिवभक्त आहे हे कळताच तो व्यथित झाला. त्यानंतर देवांच्या मार्गदर्शनाने त्यांनी महिसागर संगम तीर्थावर विश्वानंद स्तंभाची स्थापना केली. हे स्तंभ मंदिर आज स्तंभेश्वर मंदिर म्हणून ओळखले जाते. या तीर्थक्षेत्राचा उल्लेख ह्यश्री महाशिवपुराणातील रुद्र संहिता भाग-2, अध्याय 11, पान क्रमांक 358 वर आढळून येतो. या मंदिरांचा शोध 150 वर्षांपूर्वी लागला असून मंदिरात स्थित शिवलिंगाचा आकार 4 फुट उंच आणि दोन फुट व्यास असा आहे. या प्राचीन मंदिरामागे अरबी समुद्राचे विहंगम दृश्य दिसते.

इथे कसे पोहोचाल?

गुजरातमधील वडोदरा पासून ४० किमी अंतरावर जांबुसर तालुक्यात स्तंभेश्वर महादेव मंदिर आहे. हे एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. आपण रस्ते, रेल्वे आणि हवाई मार्गाने येथे पोहोचू शकता.

बोधकथा

खोड मोडली

तुकाराम नावाचा एक मीठाचा व्यापारी होता. त्याच्याजवळ एक गाढव होते. ते फार आळशी होते. रोज सकाळी तुकाराम गाढवाच्या पाठीवर मीठाच्या पिशव्या लादत असे. मग तो गाढवाला घेऊन शेजारच्या गावात मीठ विकायला जात असे. जाताना एक ओढा लागत असे. एके दिवशी ओढा ओलांडत असताना गाढवाचा पाय अचानक घसरला व ते पाण्यात पडले. त्यामुळे त्याच्या पाठीवरचे मीठाचे पोते पाण्यात भिजले.

त्यातील मीठ विरघळल्याने ते हलके झाले. त्यामुळे गाढवाचे ओझे कमी झाले. त्याला चांगलाच आराम मिळाला. दुर्सया दिवशी गाढवाने मुद्दाम पाण्यात पडल्याचे नाटक केले. मीठ पुन्हा पाण्यात भिजल्याने त्यादिवशीही गाढवाला आराम मिळाला. मग तो सारखेच असे करू लागला. पण लवकरच तुकारामला ही युक्ती लक्षात आली. त्याची खोड मोडण्यासाठी मग त्याने एके दिवशी त्याच्या पाठीवर कापसाचे ओझे ठेवले.

ओढा लागताच गाढवाने पुन्हा पडल्याचे नाटक केले. मात्र, या वेळी पाटीवर मीठाऐवजी कापूस असल्याने तो भिजल्यावर चांगलाच जड झाला. त्यामुळे गाढवाला लवकर उठता येईना. त्याला त्या दिवशी अधिकच ओझे वाहावे लागले. त्याला चांगलीच अद्दल घडली. तेव्हापासून गाढवाने कधीच पाण्यात पडल्याचे नाटक केले नाही व कामचुकारपणा केला नाही.

तात्पर्य : कामातून पळवाट शोधणे केव्हाही वाईट.

रेसिपी

पट्टी सामोसा

'पट्टी सामोसा'साठी लागणारा साहित्य:

- २ वाट्या मैदा
- १ वाटी बेसन
- मोहन घालायला ४ चमचे तेल
- १ ते दिड वाटी मटार
- २ बटाटे
- ३-४ मीरच्या
- पाउण वाटी ओले खोबरे
- फोडणीचे साहित्य: ३-४ चमचे तेल, मोहोरी, जिरे, हिंग, हळद
- १ चमचा गरम मसाला
- १ चमचा लिंबू रस
- मीठ
- तळण्यासाठी तेल

'पट्टी सामोसा'साठी लागणारा कृती:

- सर्वप्रथम मैदा व बेसन एकत्र करावे. ४-५ चमचे तेल कडकडीत गरम करावे आणि पिठाला मोहन घालावे. चवीपुरते मीठ घालावे. पाणी घालून पिठ घट्टसर मळावे व झाकून ठेवावे.
- बटाटे सोलून त्याच्या बारीक चौकोनी फोडी कराव्यात. नॉनस्टीक फ्राईंग पॅनमध्ये ३-४ चमचे तेल गरम करावे. त्यात मोहोरी, जिरे, हिंग, हळद, मिरच्या घालून फोडणी करावी त्यात मटार आणि बटाटे घालून परतावे. मध्यम आचेवर वाफ काढावी. मधेमधे ढवळावे. बटाटे व मटार शिजले कि त्यात ओले खोबरे, गरम मसाला, मीठ, लिंबू रस घालून ढवळावे.
- भिजवलेल्या पिठाच्या फुलक्याच्या आकाराच्या पातळसर पोळ्या लाटाव्यात. प्रत्येक पोळी फक्त ४-४ सेकंद भाजावी. अशा प्रकारे पोळ्या भाजून घेतल्याने समोश्यावर फुगवटे कमी येतात.
- १/२ वाटी कणिक किंवा मैदा घेउन त्याची घट्टसर पेस्ट बनवावी. भाजलेल्या प्रत्येक पोळीचे सुरीने दोन अर्धगोलाकार भाग करावेत. अर्धगोलाच्या दोन बाजू पेस्टने जोडून कोन बनावावा. त्यात १-२ चमचे भाजी भरून आधी १ बाजू आत मुडपावी दुसर्या बाजूला पेस्ट लावून ती बाजू दुमडून चिकटवावी. त्रिकोणी समोसे मध्यम आचेवर तळून काढावे.
- हे सामोसे चिंचगूळाच्या चटणीबरोबर छान लागतात.

टीप: आवडीनुसार तिखटपणा कमीजास्त करावा.



मेंदूची स्मरणशक्ती वाढवायचीय? आजपासूनच आहारात ५ गोष्टींचा करा समावेश

आपल्यालाशारीरिकआरोग्याबरोबरच मानसिक आरोग्याकडेही लक्ष देणं गरजेचं आहे. याचं कारण म्हणजे आजकालच्या जीवनशैलीत कामाच्या तणावामुळे अनेकांना नैराश्याचा सामना करावा लागतोय. यासाठी मानसिक स्वास्थ्य जपणं फार गरजेचं आहे. मानसिक आरोग्याशिवाय व्यक्ती पूर्णपणे निरोगी राहू शकत नाही. म्हणूनच शारिरीक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्य देखील खूप महत्वाचे आहे. राष्ट्रीय पोषण सप्ताहाच्या निमित्ताने आज आम्ही तुम्हाला असे ५ पदार्थ सांगणार आहोत, ज्यांच्या सेवनाने मेंदूचे आरोग्य सुधारते. हे पदार्थ कोणते ते जाणून घेऊयात.

- **ब्लूबेरी :** ब्लूबेरी अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्त्रोत आहे, ज्यामुळे मेंदूला नुकसान होण्यापासून वाचवता येते. शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यामुळे अनेक समस्या उद्भवू लागतात. नैसर्गिकरित्या वाढलेले कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी ब्लूबेरीचा वापर केला जाऊ शकतो. ब्लूबेरीमध्ये अँथोसायनिन्स आणि फायबर असतात, जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि चांगले कोलेस्ट्रॉल वाढविण्यास मदत करतात.
- **मासे :** सॅल्मन, ट्यूना आणि मॅकेरलसारखे मासे ओमेगा -३ फॅटी ॲसिडचे चांगले स्त्रोत आहेत, जे मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत. ओमेगा-३ फॅटी ॲसिडमुळे स्मरणशक्ती, नवीन गोष्टी शिकण्याची आवड आणि एकाग्रता सुधारते. त्यामुळे तुमच्या आहारात माशांचा समावेश नक्की असावा.
- **ड्रायफ्रूट्स :** ड्रायफ्रूट्स आणि बिया प्रथिने, निरोगी चरबी, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा चांगला स्त्रोत आहेत, जे मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत. ते फायबरचे एक चांगले स्त्रोत देखील आहेत. भिजवलेले काजू खाल्याने त्यामुळे तुमच्या शरीरातील ऊर्जा वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर भिजवलेले बदाम खाल्लाने स्मरणशक्ती वाढून शरीरातील कॉलेस्ट्रॉलची पातळी संतुलित होण्यास मदत होते. ज्या लोकांना लठ्ठपणाचा त्रास आहे, अशा लोकांना दररोज सकाळी ड्रायफ्रूट्सचं सेवन करायला हवं. त्यासाठी पिस्ता आणि अक्रोडचं सेवन करणं सर्वात उपयोगी मानलं जातं.
- **डार्क चॉकलेट :** डार्क चॉकलेटमध्ये फ्लेव्हॅनॉल असतात, जे वनस्पती संयुगे असतात. याच्या वापराने मेंदूतील रक्तप्रवाह सुधारतो. हे संज्ञानात्मक कार्य सुधारण्यात मदत करू शकते. चॉकलेटचे नियमित सेवन केल्याने, त्यात जे कोकाआ फ्लॅव्हॅनॉल्स असतात, ते आपल्या संज्ञानात्मक कायार्साठी चांगले फायदेशीर ठरतात. हे आपले लक्ष, गती आणि वर्किंग मेमरी लेव्हल सुधारू शकतात.
- **हिरव्या पालेभाज्या :** हिरव्या पालेभाज्या जीवनसत्त्वे, खनिजे आणि ॲंटिऑक्सिडंट्सचा चांगला स्त्रोत आहेत, जे मेंदूच्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत. ते फायबरचे एक चांगले स्त्रोत देखील आहेत, जे तुम्हाला

इतिहास–

पोषणाचे महत्त्व लक्षात घेऊन मार्च १९७५ मध्ये राष्ट्रीय पोषण दिन साजरा करण्यास सुरुवात झाली. हा उत्सव साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना खाण्यापिण्याबाबत आणि आरोग्याबाबत जागरुक व्हावे हा होता. पुढे १९८० मध्ये राष्ट्रीय पोषण सप्ताह आठवडा ऐवजी महिनाभर साजरा करण्यात आला. भारत सरकारने १९८२ मध्ये सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राष्ट्रीय पोषण दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला असला तरी दरवर्षी हा विशेष सप्ताह साजरा करण्याची घोषणा केली.राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा करणे सर्वप्रथम अमेरिकन डायटेटिक्स असोसिएशनने सुरू केले. ही संघटना आता अकादमी ऑफ न्यूट्रिशन अँड डायट सायन्सेस म्हणून ओळखली जाते.

भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या अंतर्गत अन्न आणि पोषण मंडळ दरवर्षी राष्ट्रीय पोषण सप्ताहाचे आयोजन करते. पोषण सप्ताहानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये शरीराला पोषक ठरणाऱ्या अन्नपदार्थांबाबत लोकांना जागरूक केले जाते. कोविडच्या



राष्ट्रीय पोषण सप्ताह का साजरा करतात

काळात लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाला. अशा परिस्थितीत रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणाऱ्या पोषक तत्वांबाबत लोकांना जागरूक केले जात आहे.

दरवर्षी सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा केला जातो. या दरम्यान, विविध कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातात, ज्यामध्ये शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, समुदाय केंद्रे आणि इतर सार्वजनिक ठिकाणे यांचा समावेश होतो.

राष्ट्रीय पोषण सप्ताह २०२३: थीम–

राष्ट्रीय पोषण सप्ताह २०२३ ची थीम ''महिला आणि आरोग्य'' आणि ''मुले आणि शिक्षण'' आहे. ही थीम पोषणाचे महत्त्व आणि महिला आणि मुलांच्या आरोग्यासाठी आणि विकासासाठी पोषण कसे महत्त्वाचे आहे यावर प्रकाश टाकते.

१ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रीय पोषण सप्ताह पाळला जातो. यावेळी, विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन केले जाते ज्याचा उद्देश लोकांना पोषणाच्या महत्त्वाबद्दल जागरूक करणे आहे.

राष्ट्रीय पोषण सप्ताह २०२३: महत्व–

यामुळे लोकांना पोषणाचे महत्त्व कळते.
हे निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देते.
त्यामुळे पोषणाशी संबंधित आजार टाळण्यास मदत होते.
हे पोषण माहिती आणि सेवांमध्ये प्रवेश वाढवते.

कथा/ बोधकथा

इच्छुक झाड

एका घनदाट जंगलात एक इच्छा पूर्ण करणारे झाड होते, त्याखाली बसल्याने कोणतीही इच्छा लगेच पूर्ण होते. फार कमी लोकांना हे माहीत होते कारण त्या घनदाट जंगलात जाण्याची हिंमत कोणीच करत नव्हते. एकदा योगायोगाने एक थकलेला व्यापारी त्या झाडाखाली आराम करायला बसला, त्याला कधी झोप लागली ते कळलेच नाही. तो उठताच त्याला खूप भूक लागली आहे, आजूबाजूला बघून त्याला वाटले - मला काही खायला मिळावे असे वाटते!' लगेचच स्वादिष्ट पदार्थांनी भरलेली ताट हवेत तरंगत त्याच्या समोर दिसली. व्यापाऱ्याने भरपूर अन्न खाल्ले आणि भूक शमल्यानंतर तो विचार करू लागला.. मला काही प्यायला मिळाले असते. लगेच अनेक शरबत त्याच्या समोर हवेत तरंगत आले. शरबत पिऊन तो आरामात बसला आणि विचार करू लागला - मी स्वप्न पाहतोय का? याआधी कधीच हवेतून अन्न आणि पाणी दिसल्याचे पाहिले किंवा ऐकले नाही. या झाडावर एक भूत वास्तव्य आहे जे मला खायला घालेल आणि नंतर खाईल. असा विचार करताच एक भूत त्याच्या समोर आले आणि त्याने त्याला खाल्ले. या संदर्भात आपण हे शिकू शकता की आपले मन हे इच्छा पूर्ण करणारे वृक्ष आहे, जे काही तुमची इच्छा असेल ते तुम्हाला नक्कीच मिळेल. बहुतेक लोकांना आयुष्यात वाईट गोष्टी मिळतात...कारण त्यांना वाईट गोष्टींचीच इच्छा असते किंवा चांगल्यापेक्षा वाईट होणार असा विचार असतो. माणसाला वाटतं - माझं नशीब वाईट... आणि त्याचं नशीब खरंच वाईट...! अशा प्रकारे तुमचे अवचेतन मन इच्छापूर्तीच्या झाडाप्रमाणे प्रामाणिकपणे तुमच्या इच्छा पूर्ण करत असल्याचे तुम्हाला दिसेल..! म्हणूनच तुम्ही विचारांना तुमच्या मनात काळजीपूर्वक प्रवेश द्यावा. चुकीचे विचार आले तर चुकीचे परिणाम मिळतील. तुमच्या विचारांवर नियंत्रण हेच तुमच्या आयुष्यावर नियंत्रण ठेवण्याचे रहस्य आहे...! तुमच्या विचारांमुळे तुमचे जीवन स्वर्ग किंवा नरक बनते, त्यांच्यामुळे तुमचे जीवन सुखी किंवा दुःखी होते.

उन्हाळ्यात शरीर हायड्रेट आणि एनर्जेटीक ठेवण्यासाठी 'हे' खास घरगुती उपाय!

उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे. उन्हाळा येताच ऊन आणि उष्णतेपासून बचाव करण्यासाठी लोक अनेक उपाय करतात. कोणी आपल्या आरोग्यावर लक्ष देतं, तर कोणी आपल्या त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक उपाय करतं. कारण वाढत्या उष्णतेमुळे त्वचेपासून ते शरीराच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. आज आम्ही तुम्हाला उष्णतेपासून बचाव करण्यासाठी काही घरगुती उपाय सागंणार आहोत.

उन्हाळ्यात आरोग्य राखण्यासाठी घरगुती उपाय : जास्त प्रमाणात पाणी प्या - उन्हाळ्यात शरीराला जास्त पाणी पिण्याची गरज असते. त्यामुळे तुम्हाला जास्तीत जास्त पाणी पिण्याची सवय लावली पाहिजे. त्वचा तजेलदार राहण्यासोबतच आरोग्य राखण्यासही मदत होते. उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यायल्यामुळे शरीर हायड्रेट राहण्यास मदत होते. त्यामुळे उन्हाळ्यात अशक्तपणा जाणवत नाही.

लिंबू सरबत ठरतं फायदेशीर - उन्हाळ्यात लोक लिंबू सरबताचं सेवन करणं पसंत करतात. ज्यामुळे शरीराला थंडावा मिळण्यासोबतच आरोग्यही उत्तम राखण्यास मदत होते. यामुळे शरीरातील पाण्याची कमतरताही पूर्ण होते. तसेच शरीराला उर्जा देण्यासही मदत करते.

कैरीचं पन्ह - फळांचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंब्याचं आगमन उन्हाळ्यात होतं. अशातच उन्हाळ्यात कैरीच पन्हं आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतं. कैरी, काळं मीठ आणि मिरची यांच्या मदतीने तयार केलं जाणारं कैरीचं पन्हं अनेकजणांना आवडतं. शरीराला उर्जा मिळवण्यासाठी कैरीचं पन्हं अत्यंत फायदेशीर ठरतं.

निधी नका देऊ, माझा प्रभाग दत्तक घ्या; मनसे नगरसेविकेने महापौरांनी लेखी पत्राद्वारे केली विनंती

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबई : मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात महापालिकेच्या स्तरावर महापौरांच्या माध्यमातून २५० कोटी रुपयांची सुधारणा करण्यात आल्यानंतरही भाजप आणि शिवसेनेच्या नगरसेवकांनाच निधी दिल्यामुळे इतर नगरसेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.त्यामुळे मनसेच्या नगरसेविकेने चक्क महापौरांना पत्र लिहून माझा प्रभाग आपण दत्तक घ्या. या प्रभागातील सर्व कामे आपणच करा आणि या प्रभागातील कामांचेही श्रेय आपणच घ्या. मला माज्या प्रभागातील कामांचे श्रेय नको, पण किमान मला निवडून देणाऱ्या नागरिकांची सेवा सुविधांची कामे करून त्यांना दिलासा द्या,अशीच सूचना केली.

मनसेच्या प्रभाग क्रमांक ३८च्या नगरसेविका सुरेखा परब लोके यांनी महापौरांनी पत्र लिहून माझा प्रभाग दत्तक घेण्याची विनंती केली आहे. या पत्रामध्ये सुरेखा लोके यांनी असे नमुद केले आहे की, मुंबई महापालिकेने वर्ष २०२६-२७ साठी काही लाखांच्या विकासनिधीची तरतूद केली आहे. तर दुसरीकडे, मुंबईतील अनेक वॉर्डांवर वर्ष २०२६-२७ साठी कोट्यवधींच्या विकासनिधीची खैरात करण्यात आली आहे. पण आपला प्रभाग ३८ हा झोपडपट्टीबहुल असून नागरिकांनी अपेक्षित असलेला



विकास घडवण्यासाठी माज्यावर विश्वास दाखवला आणि मला लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले. मात्र आमच्या वॉर्डासाठी अत्यल्प विकासनिधीची तरतूद झाल्यानंतर स्थानिकांच्या आशा-अपेक्षांची आणि गेल्या अनेक वर्षांपासून अपूर्ण राहिलेल्या विकासस्वप्नांची पूर्तता करायची तरी कशी, हा प्रश्न मला सतावत आहे.

मुंबईतल्या इतर वॉर्डातील नागरिक आणि आमच्या वॉर्डातील नागरिक हे मुंबईकरच आहेत. सर्व मुंबईकरांना समान वागणूक मिळणे अपेक्षित असतानाही विकासनिधीच्या माध्यमातून आमच्या वॉर्डातील नागरिकांना भेदभावपूर्ण वागणूक देणे निश्चितच भूषणावह नाही. नगरसेवक म्हणून निवडून देणाऱ्या मतदार- नागरिकांना दिली जाणारी ही दुय्यम वागणूक म्हणजे त्यांचा घोर अपमान आहे.

वॉर्डात गटारदुरुस्तीपासून शौचालयांच्या स्वच्छतेपर्यंतच्या अनेक मूलभूत- महत्वाच्या कामांसाठी अनेक चाळींनी माज्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केलेली आहे. दुर्दैवाने, २०२६-२७ वर्षात स्थानिकांना अपेक्षित असलेली कामे महापालिकेने तरतूद केलेल्या तुटपूंज्या निधीतून पूर्ण करणे मला शक्यच होणार नाही. म्हणूनच वॉर्ड क्र. ३८ आपण स्वतः दत्तक घ्यावा! अशी विनंती त्यांनी महापौरांना केली. या पत्रासोबत वॉर्डातील अत्यावश्यक- मूलभूत विकासकामांची यादीही त्यांनी सोबत जोडली आहे. त्यानुसार आपण मुंबईच्या महापौर म्हणून वॉर्ड क्र. ३८ मधील प्रलंबित विकासकामे पूर्ण करून स्थानिक नागरिकांना दिलासा द्यावा. प्रश्न विकासकामांचे श्रेय घेण्याचाच आहे ना? आपण संपूर्ण श्रेय घ्या! पण आमच्या वॉर्डातील नागरिकांच्या भावनांशी खेळू नका,असेही नमुद केले.

विरारमध्ये आरटीआय कार्यकर्त्याची हत्या

■विरार। प्रतिनिधी,

विरारच्या शिरगाव परिसरातील खदाणी जवळ आरटीआय कार्यकर्ता आणि मंडल अधिकारी यांच्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी घडली आहे. या हल्ल्यात आरटीआय कार्यकर्ते आत्माराम पाटील यांचा जागीच मृत्यू झाला असून मंडल अधिकारी प्रभाकर पाटील आणि त्यांचा एक सहकारी गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शिरगाव येथील खदाणीबाबत तक्रारदार, अमित चौधरी यांनी तक्रार केली होती. या तक्रारीची पाहणी करण्यासाठी तहसीलदारांच्या आदेशानुसार मंडल अधिकारी प्रभाकर पाटील घटनास्थळी गेले होते. त्यावेळी तक्रारदाराच्या सांगण्यावरून आत्माराम पाटील हे तेथील परिस्थिती दाखवण्यासाठी गेले असता आरोपींनी जुन्या वादातून त्यांच्यावर लाठी-काठ्यांनी हल्ला केला. तसेच दगडाने ठेचून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात मंडल अधिकाऱ्यांच्या वाहनाची मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच विरार पोलीस, फॉरेन्सिक पथक आणि वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन परिसराची पाहणी केली आहे. या प्रकरणात १० ते १२ जणांचा सहभाग असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. आतापर्यंत दोघांना ताब्यात घेण्यात आले असून इतर आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली.

महाराष्ट्रातील 57 तरुण पाकिस्तानी गुंडाच्या जाळ्यात अडकले? एटीएसकडून राज्यभर छापेमारी

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने 13 मे देशविरोधी कारस्थानांना हाणून पाडण्यासाठी एक मोठी मोहीम हाती घेतली. आज पहाटेपासूनच पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टी याच्या संपर्कात असलेल्या संशयितांच्या विविध ठिकाणांवर एटीएसची पथके छापेमारी करून त्यांची कसून चौकशी करत आहेत.



भारतीय तरुणांची माथी भडकवून त्यांना देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करण्याकरिता शहजाद भट्टी हा सोशल मीडियाचा वापर करत असल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, एटीएसच्या पथकांनी आज सकाळी 8 वाजण्याच्या सुमारास राज्यातील अनेक शहरांमध्ये एकाच वेळी छापेमारी सुरू केली. पाकिस्तानी गुंड शहजाद भट्टी हा डिजिटल माध्यमांचा वापर करून महाराष्ट्रातील तरुणांमध्ये आपले जाळे विस्तारण्याचा प्रयत्न करत असल्याची गुप्त माहिती सुरक्षा यंत्रणांना मिळाली होती. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे एटीएसने राज्यातील अशा 57 व्यक्तींची ओळख पटवली आहे, ज्यांचा भट्टीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संपर्क आला होता. सध्या एटीएसची पथके या सर्व संशयितांच्या ठिकाणांवर उपस्थित असून त्यांची कसून चौकशी करत आहेत.

संशयित तरुण एखाद्या मोठ्या दहशतवादी कटाचा किंवा संघटित गुन्हेगारी टोळीचा भाग बनण्यासाठी तयार केले जात होते का? या गोष्टीचा छडा लावण्याचा प्रयत्न एटीएसचे अधिकारी सध्या करत आहेत.

भट्टी हा या तरुणांचे ब्रेनवॉशिंग करून त्यांना भविष्यातील बेकायदेशीर कारवायांसाठी तयार करत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. राज्यभर पसरलेले हे संशयित जाळे पूर्णपणे उद्ध्वस्त करण्यासाठी एटीएसची ही मोहीम सध्या सुरू असून, येत्या काही तासांत याप्रकरणी महत्त्वपूर्ण अटकसत्र होण्याची शक्यता आहे. एटीएस सध्या या संपूर्ण प्रकरणाशी संबंधित डिजिटल पुरावे आणि कॉल रेकॉर्ड्सची बारकाईने तपासणी करत आहे.

मोदींनी केवळ सहा महिने मागितले आहेत, फडणवीसांनी विरोधकांसह नागरिकांना केले ह्यहेह्ण आवाहन

■मुंबई। प्रतिनिधी,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर, वर्क फ्रॉम होमला प्राधान्य, वर्षभर सोन्याची खरेदी टाळा, स्थानिक उत्पादनांचा (स्वदेशी) वापर वाढवण्यावर भर द्या, परदेश दौरे करू नका, असे आवाहन देशातील नागरिकांना केले आहे. पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परकीय चलन वाचवण्यासाठी आणि प्रशासकीय खर्च कमी करण्यासाठी विविध सरकारी कामांसाठी किंवा अभ्यासासाठी परदेशात जाणाऱ्या मंत्री आणि अधिकाऱ्यांचे दौरे रद्द केले आहेत. यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी देशातील नागरिकांना आवाहन केले आहे. माध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की,



मला विरोधी पक्षांना सांगायचंय की, ज्यावेळी वैश्विक संकटाची परिस्थिती असते, त्यावेळी जर देशाच्या पंतप्रधानांनी काही उपाययोजना सांगितल्या, तर त्या उपाययोजना तुम्हाला करता येत नसतील, तर किमान थट्टा मस्करी तरी करू नका. आज केवळ भारतासमोर नाही तर जगासमोर संकट आहे. त्यामुळे आपलं परकीय चलन आपण वाचवलं पाहिजे आणि आपल्या इथे महागाई वाढून नये, या दृष्टीन मोठ्या प्रमाणात पंतप्रधानांनी ज्या काही उपाययोजना सांगितल्या आहेत, त्या करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला आपली जीवनशैली थोडी थोडी जरी बदलली तरी देखील आपण देशाला मदत करू शकू. सहा महिन्याकरता जर पंतप्रधानांनी देशवासियांना आव्हान केलंय, तर मला विश्वास आहे की, भारतातले आपले देशवासी त्या बाबतीत मदतच करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विरोधी पक्षाने कितीही थट्टा मस्करी केली तरी देखील वैश्विक संकटात जर आपण देशाच्या पाठीशी उभं राहिलो नाहीत, तर हे योग्य होणार नाही. महाराष्ट्रामध्ये देखील आम्ही निर्णय केलेला आहे. माज्यासह मंत्र्यांचे कॉन्वॉय हे छोटे आम्ही करत आहोत. विदेश यात्रांवर अधिकारी असतील किंवा मंत्री असतील त्याठिकाणी आम्ही निर्बंध आणतो आहोत. ज्या-ज्या गोष्टींमध्ये परकीय चलन खर्च होतं, त्या-त्या गोष्टींची खपत कशी कमी करता येईल याचा प्रयत्न आम्ही करतो आहोत. वेगवेगळ्या पद्धतीने आपल्याला आपल्या देशी गोष्टींना कशी वाव देता येईल, असा प्रयत्न देखील आम्ही करतो आहोत.

तारापूर ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचाला ४ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले


■पालघर। प्रतिनिधी, :

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पालघर पथकाने तारापूर ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचाला ४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडल्याची आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. तक्रारदार व त्यांच्या बहिणीला अँबॉस कटिंग व्यवसाय सुरू करण्यासाठी बँकेकडून व्यावसायिक कर्ज घ्यायचे होते. त्यासाठी ग्रामपंचायतीची ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) आवश्यक होते. संबंधित कागदपत्र देण्यासाठी तारापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच संध्या संजय पागधरे यांनी सुरुवातीला ५ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार करण्यात आली होती. तक्रारदाराने लाच देण्यास नकार देत पालघर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. त्यानंतर सापळा रचण्यात आला. पडताळणीत ५ हजार रुपयांच्या मागणीची खात्री झाल्यानंतर तडजोडीअंती ४ हजार रुपये स्वतःसाठी व १ हजार रुपये ग्रामपंचायतीच्या पावतीसाठी स्वीकारण्याचे ठरल्याचे निष्पन्न झाले. बुधवारी १३ मे रोजी तारापूर ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित सापळा कारवाईदरम्यान सरपंच संध्या पागधरे यांना ४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी तारापूर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

जनगणना कामात टाळाटाळ, ४६ कर्मचाऱ्यांवर कारवाई

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर नगरपरिषद हद्दीतील जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरयादी व घरगणना प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या काही शिक्षक, बीएलओ व कर्मचाऱ्यांकडून सहकार्य मिळत नसल्याने प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. जनगणना कार्यात जाणीवपूर्वक टाळाटाळ करणाऱ्या ४६ कर्मचाऱ्यांवर जनगणना अधिनियम १९४८ व १९९० अंतर्गत कारवाई करण्यात येत असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ. प्रशांत



जाधव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. नगरपरिषद प्रशासनाकडून संबंधित कर्मचाऱ्यांसाठी २४ एप्रिल २०२६ ते ९ मे २०२६ या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या दरम्यान संबंधित कर्मचाऱ्यांना वारंवार सूचना देण्यात आल्या. तसेच दूरध्वनी संदेश व लेखी नोटीसद्वारेही प्रशिक्षण व जनगणना कायार्बाबत कळविण्यात आले होते.मात्र, अनेक कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय महत्त्वाच्या या कामात अपेक्षित सहकार्य न करता अनुपस्थित राहणे व कामात टाळाटाळ करणे सुरूच ठेवल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला बुलेट ट्रेन प्रकल्पाचा प्रत्यक्ष अनुभव

■डहाणू। प्रतिनिधी,

डहाणू येथील आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला भेट देत एक अविस्मरणीय अनुभव घेतला. डहाणूचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी विशाल खत्री यांच्या पुढाकारातून तसेच एल अँड टी कंपनीच्या सहकार्याने या विशेष अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन आधुनिक तंत्रज्ञान, मोठे पायाभूत प्रकल्प आणि अभियांत्रिकी क्षेत्राची प्रत्यक्ष माहिती मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. सध्या डहाणू प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सवने, झरी, तलासरी, तवा, साखरे, रणकोळ, अस्वाली, वरवाडा, डोंगरी आणि उधवा येथील एकूण १० आश्रमशाळांमधील सुमारे ३५० विद्यार्थी बारावीच्या पूर्वतयारीसाठी क्रॅश कोर्स अंतर्गत जादा तास घेत आहेत.

नदी आणि नाल्यातील गाळ ४८ तासांत उचलाच, अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांचे निर्देश

■मुंबई। प्रतिनिधी,

नदी / नाल्यातून काढलेला गाळाची ४८ तासांच्या आत निर्धारित ठिकाणी नेऊन विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. तरीही काही ठिकाणी आजपर्यंत काढलेल्या गाळाची वाहतूक प्रलंबित असल्याचे आढळले आहे. या पार्श्वभूमीवर, गुरूवार १४ मे आणि शुक्रवार, १५ मे २०२६ या दोन दिवशी गाळ वाहतुक करण्याकामी विशेष मोहिम राबवावी. नाल्यांतून काढलेला गाळ कोणत्याही परिस्थितीत रस्त्याकडेला प्रलंबित राहणार नाही, हे सुनिश्चित करावे. गाळ काढल्यानंतर ४८ तासांत त्याचे वहन होईल, याची खातरजमा करावी. गाळ वाहतूक प्रलंबित राहिल्याचे आढळल्यास संबंधित अभियंत्यांविरोधात कठोर कारवाई करू, असा इशारा अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी दिला. पाणी साचण्याच्या ठिकाणांवर लक्ष केंद्रीत करून पाण्याचा जलद गतीने निचरा होण्याकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना आखाव्यात. दुय्यम अभियंता, सहायक अभियंता यांनी दररोज प्रत्यक्ष कार्यस्थळी उपस्थित रहावे, असे निर्देशही बांगर यांनी दिले. यंदाच्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नदी / नाल्यांतून गाळ काढण्याच्या कामांची आढावा बैठक अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी १३ मे २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयात संपन्न झाली. प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) सुनीलदत्त रसाळ यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर म्हणाले की, मुंबई महानगरातील मोठ्या व लहान नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे ३१ मे २०२६ पर्यंतच्या विहित मुदतीत पूर्णत्वाकडे न्यावीत. त्याद्दष्टीने नियोजन करून संपूर्ण यंत्रणेने कार्यवाहीला वेग द्यावा. गाळ काढण्याची कामे योग्यरित्या होण्यासह त्यावर



देखरेख करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या दुय्यम अभियंता, सहायक अभियंता यांनी प्रत्यक्ष कार्यस्थळी हजर रहावे. नाल्यांमधून काढलेल्या गाळाची ४८ तासांत वाहतूक करावी. रस्त्याकडेला गाळाचा ढीग आढळता कामा नये. पुढील ४८ तासात विनिर्दिष्ट ठिकाणी गाळाची विल्हेवाट लावावी. नागरिक, लोकप्रतिनिधी यांची तक्रार आल्यास संबंधितांविरोधात कारवाई करण्यात येईल.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) बांगर म्हणाले की, नालेस्वच्छतेचे, गाळ काढण्याचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक आहे. मात्र, उद्दिष्ट पूर्ण करून नालेस्वच्छतेची कामे थांबू नयेत. त्याचबरोबर पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणांचा अभियंत्यांनी स्वयंप्रेरणेने शोध घ्यावा. आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात. पावसाचे पाणी साचते त्या ठिकाणचा व आजूबाजूच्या परिसराचा स्थळनिहाय अभ्यास करावा. ५० / १०० मीटरच्या परिघातील पर्जन्य जलवाहिन्या, बंदिस्त वाहिन्या, कल्वर्टची परिणामकारकपणे स्वच्छता करावी. त्या तुंबणार नाहीत, याची खातरजमा करावी. एका टोकापासून दुस-या टोकापर्यंत वाहिन्या संपूर्णतः मोकळ्या करण्यात आल्या आहेत का, याची खातरजमा करावी. नाल्यालगतच्या रहिवाशांकडून नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत असल्याच्या तक्रारी असल्या तरी तरीही तरंगत्या कच-याची (फ्लोटींग मटेरियल) योग्यप्रकारे विल्हेवाट लावावी. नालेस्वच्छतेची / गाळ काढण्याची कामे पूर्ण झाली असली तरी मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात आणि जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा - पुन्हा तरंगता कचरा बाहेर काढण्यात यावा. त्यासाठी मोहिम राबवावी. पावसाळा सुरू होण्यापूर्वी तरंगता कचरा काढणे अत्यंत आवश्यक आहे. तरंगता कचरा आढळणारी ठिकाणे निश्चित करून एकापेक्षा अधिक वेळा तरंगता कचरा बाहेर काढावा, असेही निर्देश बांगर यांनी दिले. नालेस्वच्छतेची कामे गुणवत्तापूर्ण व्हावीत यासाठी कायमच दक्ष रहावे. त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक यांच्याशी समन्वय, संवाद साधावा. दैनंदिन कार्यवाहीची माहिती लोकप्रतिनिधींना द्यावी, नालेस्वच्छतेची कामे पाहण्यासाठी स्थानिक नगरसेवकांना निमंत्रित करावे, असेदेखील अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त बांगर यांनी नमूद केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com